# पिंपरी चिंचवड महानगरपालिका
## मा.विधी समिती
## कार्यपत्रिका क्रमांक : २४
## सभावृत्तांत

दिनांक : १८/६/२०१० वेळ : दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.विधी समितीची पाक्षीक सभा शुक्रवार दि.१८/६/२०१० रोजी दुपारी २.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.बाळासाहेब उर्फ खंडुशेठ दगडु कोकणे - सभापती
२. मा.ढोरे उषा उर्फ माई मनोहर
३. मा.बारणे सिद्धेश्वर बाळासाहेब
४. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश
५. मा. खोमणे लता हनुमंत
६. मा.चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

याशिवाय मा.देशमुख,मा.गायकवाड -सहा.आयुक्त,मा.चाकणकर-उपनगरसचिव, मा.जाधव,मा.बनकर -कार्य.अभियंता,मा.जगताप-समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

------------------

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीप्रमाणे खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करून घेणेत आले-

विषय क्रमांक- ४) वॉर्ड क्र. ४१ काळभोरनगरमध्ये उर्वरित रस्ते हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेबाबत...

विषय क्रमांक- ५) वॉर्ड क्र. ४१ काळभोरनगरमधील रस्त्याच्या कडेने पावसाळी गटर, खडीमुरूमासह पेव्हींग ब्लॉक व फुटपाथ करणेबाबत...

विषय क्रमांक- ६) वॉर्ड क्र. ४१ काळभोरनगर जय गणेश व्हीजन जवळील अंतर्गत रस्त्याचे स्टॉर्म वॉटर पाईप टाकणे खडीमुरूमासह पेव्हींग ब्लॉक बसविणे व फुटपाथ करणेबाबत...

विषय क्रमांक- ७) वॉर्ड क्र. ४१ काळभोरनगर जय गणेश व्हीजन जवळील अंतर्गत रस्त्याचे खडीमुरूम व बी.बी.एम.करणेबाबत...

विषय क्रमांक- ८) लेखापाल पदासाठी पदोन्नतीसाठी मानीव तारीख देणेबाबत...

विषय क्रमांक- ९) अपंग व्यक्तीच्या विकासाच्या योजनाबाबत...

विषय क्रमांक- १०) महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील कनिष्ठ अभियंता यांचे मनपातील प्रतिनियुक्तीवरील सेवेबाबत-मा.उषा ढोरे, मा.लता खोमणे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- ११) विजतंत्री पदावर पदोन्नती देणेबाबत - मा.सिद्धेश्वर बारणे, मा.उषा ढोरे यांचा प्रस्ताव...

विषय क्रमांक- १२) जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरल्यास सेवासमाप्ती अथवा पदावनती करणेबाबत - मा.उषा ढोरे, मा.लता खोमणे यांचा प्रस्ताव...

------------------

दिनांक ४/६/२०१० रोजी झालेल्या सभेचा (कार्यपत्रिका क्रमांक २३) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा. सभापती यांनी प्रकट केले.

------------------

ठराव क्रमांक :- ५५९ विषय क्रमांक :- १
दिनांक :- १८/६/२०१० विभाग :- विद्युत अ प्रभाग
सुचक :-मा. उषा ढोरे अनुमोदक:-मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.अ.प्र./वि/कावि/२०७/१० दि.४/०६/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र.४४ मधील यमुनानगर येथील जलतरण तलावाकरीता फिल्ट्रेशन यंत्रणा बसविणेकामी र.रु.३४,५०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- ५६० विषय क्रमांक :- २
दिनांक :- १८/६/२०१० विभाग :- ड प्रभाग स्थापत्य
सुचक :-मा.लता खोमणे अनुमोदक :-मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.डप्र./स्था/१/कावि/५४५/१० दि.७/०६/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

प्रभाग क्र. ९५ कवडेनगर मधील अंतर्गत रस्त्याचे हॉटमिक्स पध्दतीने डांबरीकरण करणेकामी र.रु.७९,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- ५६१ विषय क्रमांक :- ३
दिनांक :- १८/६/२०१० विभाग :- स्थापत्य ब मुख्य
सुचक :-मा.सिद्धेश्वर बारणे अनुमोदक :-मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :- मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था ब.मु./काअ/२४९/१० दि.९/०६/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

मुख्य प्रशा. इमारतीमधील लेखा विभागाचे अद्यावत बैठक व्यवस्था फर्निचर व अनुषंगिक कामे करणेकामी र.रु. ३६,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले-

ठराव क्रमांक :- ५६२ विषय क्रमांक :- ४
दिनांक :- १८/६/२०१० विभाग :- अ प्रभाग स्थापत्य
सुचक :-मा.उषा ढोरे अनुमोदक :-मा.लता खोमणे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/अप्र/६९५/१० दि.१०/०६/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.४१ काळभोरनगरमध्ये उर्वरीत रस्ते हॉटमिक्स पद्धतीने डांबरीकरण करणेकामी र.रु.२०,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- ५६३ विषय क्रमांक :- ५
दिनांक :- १८/६/२०१० विभाग :- अ प्रभाग स्थापत्य
सुचक :-मा.स्मिता गुंजेकर अनुमोदक :-मा.लता खोमणे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/अप्र/६९६/१० दि.१०/०६/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.४१ काळभोरनगर मधील रस्त्याच्या कडेने पावसाळी गटर, खडीमुरुमासह पेव्हींग ब्लॉक व फुटपाथ करणेकामी र.रु.१७,८०,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- ५६४ विषय क्रमांक :- ६
दिनांक :- १८/६/२०१० विभाग :- अ प्रभाग स्थापत्य
सुचक :-मा.अख्तरहुसेन चौधरी अनुमोदक :-मा.उषा ढोरे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/अप्र/६९७/१० दि.१०/०६/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.४१ काळभोरनगर जय गणेश व्हिजन जवळील अंतर्गत रस्त्याचे स्टॉर्म वॉटर पाईप टाकणे खडीमुरुमासह पेव्हींग ब्लॉक बसविणे व फुटपाथ करणेकामी र.रु.१६,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- ५६५ विषय क्रमांक :- ७
दिनांक :- १८/६/२०१० विभाग :- अ प्रभाग स्थापत्य
सुचक :-मा.सिद्धेश्वर बारणे अनुमोदक :-मा.स्मिता गुंजेकर
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.स्था/अप्र/६९८/१० दि.१०/०६/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

वॉर्ड क्र.४१ काळभोरनगर जय गणेश व्हिजन जवळील अंतर्गत रस्त्याचे खडीमुरुम व बी.बी.एम. करणेकामी र.रु.१५,००,०००/- चे खर्चास प्रशासकीय मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- ५६६ विषय क्रमांक :- ८
दिनांक :- १८/६/२०१० विभाग :- प्रशासन
सुचक :-मा.लता खोमणे अनुमोदक :-मा.अख्तरहुसेन चौधरी
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.प्रशा/२/कावि/८३९/१० दि.१५/०६/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

श्री.रमेशकुमार विठ्ठलराव जोशी यांची दिनांक १६.२.१९९८ रोजी झालेल्या पदोन्नती समितीने भटक्या जमाती (ब) प्रवर्गातून लेखापाल पदावर पदोन्नतीसाठी निवड केलेली असताना त्यांना पदोन्नती देण्यात आलेली नसल्याने श्री.रमेशकुमार विठ्ठलराव जोशी यांना मागील कालावधीतील कोणतेही आर्थिक लाभ न देता केवळ लेखापाल पदाचे सेवा जेष्ठतेकरिता दिनांक २६.७.२००० ही मानीव तारीख देण्यास दिनांक ३०.४.२०१० रोजी झालेल्या समितीने केलेल्या शिफारसीप्रमाणे मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- ५६७ विषय क्रमांक :- ९
दिनांक :- १८/६/२०१० विभाग :-नागरवस्ती विकास योजना
सुचक :-मा.उषा ढोरे अनुमोदक :-मा.लता खोमणे
संदर्भ :-मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.नावियो/१/कावि/४६२/१० दि.१७/०६/२०१०

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेवुन -

पिंपरी चिंचवड महापालिका क्षेत्रात वास्तव्य असलेल्या अपंग व्यक्तिंच्या विकासाकरिता आधारनिधी योजनेअंतर्गत अंध,अपंग,मतिमंदाच्या विकासाच्या योजनांचा अपंग व्यक्तिच्या विकासाच्या योजनांमध्ये समावेश करुन प्रस्तावासोबतच्या प्रपत्र अ प्रमाणे अपंग विकासाच्या योजना नव्याने सुरु करणेस तसेच अपंग कल्याणकारी योजनेअंतर्गत घटक योजनांमध्ये भविष्यकाळात आवश्यक ते बदल/सुधारणा मा.आयुक्त अथवा मा.अति.आयुक्त यांनी करणेस मान्यता देणेकामी मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.महापालिका सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- ५६८ विषय क्रमांक :- १०
दिनांक :- १८/६/२०१०
सुचक :-मा.उषा ढोरे अनुमोदक :-मा.लता खोमणे
संदर्भ :-मा.उषा ढोरे, मा.लता खोमणे यांचा प्रस्ताव...

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील एकूण १६ कनिष्ठ अभियंता पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये पाणीपुरवठा व जलनि:सारण विभागाकडे प्रतिनियुक्तीवर कार्यरत आहेत. सदर कर्मचाऱ्यांचे नाव, मनपा सेवेतील रुजू दिनांक व मुदत याबाबतचा सविस्तर तपशील प्रस्तावासोबतचे परिशिष्ट अ येथे जोडलेला आहे. तरी प्रस्तावासोबतचे यादीतील १६ कर्मचाऱ्यांच्या त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या मनपाकडील रुजू तारखेपासूनचे प्रतिनियुक्तीच्या सेवेस तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडून मनपाकडे नव्याने प्रतिनियुक्तीवर नियुक्त झालेले श्री.डी.बी.जगधने व श्री. आर.बी.यंदे यांचे प्रतिनियुक्ती सेवेस तसेच प्रस्तावासोबतचे यादीतील कनिष्ठ अभियंता श्री.पी.के.जाधव व श्री.एम.व्ही.मारणे यांची मनपा प्रतिनियुक्ती सेवा रद्द करुन त्यांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडे परत पाठविणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्रमांक :- ५६९ विषय क्रमांक :- ११
दिनांक :- १८/६/२०१०
सुचक :-मा.सिद्धेश्वर बारणे अनुमोदक :-मा.उषा ढोरे
संदर्भ :-मा.सिद्धेश्वर बारणे,मा.उषा ढोरे यांचा प्रस्ताव...

श्री. अनिल रामलिंग कडवे यांना विशेष मागास प्रवर्गातून विजतंत्री पदावर पदोन्नती देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

ठराव क्रमांक :- ५७० विषय क्रमांक :- १२
दिनांक :- १८/६/२०१०
सुचक :- मा.उषा ढोरे अनुमोदक :- मा.लता खोमणे
संदर्भ :-मा.उषा ढोरे, मा.लता खोमणे यांचा प्रस्ताव...

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस महाराष्ट्र विधानमंडळाचे अनु.जाती कल्याण समिती व अनु.जमाती कल्याण समिती यांनी भेटी दिलेल्या असुन आरक्षण व अनुशेषाबाबतही सूचना दिलेल्या आहेत. भारतीय राज्यघटना आणि शासनाचे धोरणानुसार आरक्षित जागांचा फायदा नियमानुसार पात्र लाभार्थींनाच मिळणे आवश्यक आहे. या कार्यवाही मुदतीत व वेळोवेळीचे मा.शासनाचे व मा.उच्च न्यायालयाचे निर्देश तपासून कराव्या लागतात. या बाबींचा विचार करुन जात वैधता प्रमाणपत्र अवैध ठरल्यास किंवा मा.शासनाचे किंवा मा.उच्च न्यायालयाचे निर्देशानुसार वेळेत प्राप्त न झाल्यास संबंधित वर्ग ३ व ४ मधील कर्मचाऱ्यांवर सेवा समाप्ती अथवा पदावनती इत्यादि कार्यवाही यापुढे वेळोवेळी मा.आयुक्त यांनी करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------------------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

(बाळासाहेब उर्फ खंडूशेठ दगडू कोकणे)
सभापती
विधी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी- ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी- ४११ ०१८.नगरसचिव कार्यालय
क्रमांक- नस/९/कावि/९२७/२०१०
दिनांक- १९/०६/२०१० चे लगत

उपनगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

प्रत- सर्व संबंधीत शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडे
पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.